INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६९
फॅक्स - २४२२५७३३

जावक क्र. ६५९/२०२३

दि. ३० ऑक्टोबर, २०२३

**श्री. रमेश बैस साहेब**
मा. राज्यपाल, महाराष्ट्र
राजभवन, मुंबई

**विषय - राज्यातील ज्वलंत प्रश्नांवर महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन तातडीने बोलवणेबाबत.**

**महोदय,**

राज्यात सध्या मराठा आरक्षण तसेच ओबीसी आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आला असून, या समाज घटकांमध्ये सरकारबद्दल तीव्र नाराजी व संताप आहे. या समाजांकडून आरक्षणाची मागणी होत असताना सरकारी पातळीवर समाधानकारक व गतीमानतेने काम होताना दिसत नाही. आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारमध्येच एकवाक्यता नाही. त्यामुळे समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण होत असून, राज्यातील शांतता भंग होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. समाजाची सहनशीलता संपलेली आहे, राज्य सरकारने त्यांच्या सहनशीलतेचा अधिक अंत पाहू नये. या गंभीर परिस्थितीतही सरकार ठोस निर्णय घेत नसून केवळ वेळकाढूपणा करते आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे २५ ऑक्टोबर पासून बेमुदत उपोषणावर बसले आहेत. त्यांनी अन्न व पाणी दोहोंचाही त्याग केला आहे. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळते आहे. दुसरीकडे दररोज मराठा तरूणांच्या आत्महत्येच्या दुर्दैवी घटना घडत आहेत. त्यामुळे मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्र कमालीचा अस्वस्थ झाला आहे. दुसरीकडे मराठा आरक्षण कसे देणार, केव्हा देणार याबाबत राज्य सरकार कोणतीही स्पष्ट भूमिका घेताना दिसत नाही. राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांना एक महिन्यात आरक्षण देण्याचे जाहीर आश्वासन दिले होते. ती मुदत संपली तरी मराठा आरक्षण देण्याच्या मागणीचा सरकार गांभिर्याने विचार करत नसल्याची भावना समाजात वाढीस लागलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज तसेच शाहु, फुले, आंबेडकर यांच्या

INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३

महाराष्ट्रातील सध्याचे वातावरण चिंताजनक आहे. आरक्षण प्रश्नावरून राज्यातील वातावरण स्फोटक बनत चालले आहे. जनतेचा संयम सुटणार नाही याची काळजी आपल्याला घ्यावी लागणार आहे. आरक्षणांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी जातनिहाय जनगणना करणे व आरक्षणाची 50 % मर्यादा हटवणे गरजेचे आहे.

महोदय,

आरक्षणाच्या प्रश्नासोबतच राज्यात आज शेतकऱ्यांची परिस्थिती चिंताजनक बनलेली आहे. यावर्षी कमी पाऊस झाल्यामुळे पाण्याची परिस्थिती बिकट झालेली आहे. सप्टेंबर महिन्यापासूनच राज्यातील विविध जिल्ह्यात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असून यात दररोज वाढ होत आहे. कमी पावसामुळे राज्यातील २४ जिल्ह्यातील खरीप हंगाम खराब गेला आहे. तर रब्बी हंगामाची स्थितीही फारशी चांगली नाही. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर आहे, शेतमालाला भाव नाही, कांदा, कापूस, केळी, सोयाबीन, डाळींना भाव मिळाला नाही. कापूस तर शेतकऱ्यांच्या घरातच पडून राहिला आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे. जगाचा पोशिंदा बळीराजा संकटात असताना मायबाप सरकारने मोठा आधार देऊन त्याला उभे केले पाहिजे. पण राज्य सरकारकडून त्याकडे दुर्लक्ष होत आहे. सोयाबीन, कापूस, धान यासह इतर पिकांची हमीभाव केंद्रे सुरू केली पाहिजेत. दिवाळीचा सण आठ-दहा दिवसांवर आला आहे. मात्र राज्य सरकारची भरीव मदत आणि पीक विम्याची नुकसान भरपाई न मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे. राज्यात मोठ्या संख्येने शेतकरी आत्महत्येच्या घटनाही घडत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे. मात्र, याबाबतही राज्य सरकारकडून अपेक्षीत कार्यवाही वेगाने होताना दिसत नाही.

INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी -२४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६१
फॅक्स - २४२२५७३३

महोदय,

महाराष्ट्र राज्याची कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीत देशात नावलौकिक असलेले राज्य अशी ओळख आहे. पण राज्यातील मागील काही दिवसातील घटना पाहता राज्याच्या या लौकिकाला काळिमा फासणाऱ्या घटना घडल्या आहेत. नाशिक शहरात अंमली पदार्थांचा कारखाना सापडला. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूरातील एमआयडीसीमध्येही असाच एक कारखाना सापडला. या ठिकाणी अंमली पदार्थांचे मोठ्या प्रमाणात साठे सापडले. तरुण पिढीमध्ये हे विष पसरवून तरुणांना बरबाद करण्याचे काम करणाऱ्यांवर जरब बसली पाहिजे. परंतु, राज्य सरकारचा ड्रग्ज माफियांवर अंकूश असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या प्रकरणी कठोर कारवाई होऊन याप्रकरणी ड्रग माफियांचे रॅकेट उद्ध्वस्त करणे गरजेचे आहे.

राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. महिला व मुलींचे बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले आहे. महिला बेपत्ता प्रकरण पोलीस प्रशासनाने गांभिर्याने घेतल्याचे दिसत नाही. महिला अत्याचाराचे प्रमाणही वाढले आहे. बेरोजगारीचा प्रश्नही मोठा आहे, राज्यात लाखोंच्या संख्येने तरुण बेकार आहेत. राज्य सरकार रिक्त जागा भरत नाही. शिक्षक, पोलीस, आरोग्य विभागासह सर्व विभागातील रिक्त जागा कालबद्ध कार्यक्रम आखून भरल्या पाहिजेत. राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कमालीची कोलमडली आहे. वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, औषधांची कमतरता यामुळे ठाणे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, नागपूरच्या शासकीय रुग्णालयात मागील महिन्यातच नवजात बालकांसह मोठ्या संख्येने रुग्णांचे मृत्यू झाले. हा प्रकार राज्याची प्रतीमा डागाळणारा व आरोग्य सेवेचे धिंडवडे काढणारा आहे.

महोदय,

हे सर्व ज्वलंत प्रश्न राज्यातील जनतेच्या हिताशी व दैनंदिन जीवनाशी निगडीत आहेत. या विषयांवर विधीमंडळात तातडीने चर्चा होऊन राज्याला वस्तुस्थिती कळणे व राज्य सरकारकडून होत असलेली उपाययोजना अवगत करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे या गंभीर प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आपण विनाविलंब राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणी आम्ही करत आहोत. राज्यातील एकंदर भीषण परिस्थिती बघता आपण आमची मागणी मान्य करावी, ही विनंती.

धन्यवाद...

| | | |
|---|---|---|
| ( नाना पटोले )<br>अध्यक्ष | ( बाळासाहेब थोरात )<br>विधिमंडळ पक्षनेते | (विजय वडेट्टीवार )<br>विरोधी पक्षनेता |
| ( सुशीलकुमार शिंदे )<br>माजी मुख्यमंत्री | ( अशोकराव चव्हाण )<br>माजी मुख्यमंत्री | ( पृथ्वीराज चव्हाण )<br>माजी मुख्यमंत्री |

रविंद्र वायकर
शिवसेना (उद्धव ठाकरे)

| | | |
|---|---|---|
| **(डॉ.नितीन राऊत)**<br>**माजी मंत्री** | **(वर्षा गायकवाड)**<br>**अध्यक्ष,मुबई काँग्रेस** | **(अमीन पटेल)**<br>**उप नेते** |
| **(सुरेश वरपूडकर)**<br>**मुख्य प्रतोद** | **(प्रणिती शिंदे)**<br>**प्रतोद** | **(अस्लम शेख)**<br>**माजी मंत्री** |

INDIAN NATIONAL CONGRESS

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
Email - office@mahacongress.com

दुरध्वनी - २४२३३०००
२४३०१३०१
२४३०१३६९
फॅक्स - २४२२५७३३

(नसीम खान)

([illegible])

Dr. W. A. Mirza

([illegible])

(भास्करराव पाटील)

J. Antapurkar (जितेश अंतापुरकर)

(ॲड हुस्नबानु खलिफे)

(संग्राम थोपटे)

डॉ. माधवराव पवार जवळगावकर

([illegible])

डॉ. कल्याण वै. काळे

Dhiraj Deshmukh

(सहसराम कोरोटे)

(Mohanrao Hambarde)